# प्रेस नोट

दिनांक-१६/०७/२०२०

## सोलापूर ग्रामीण पोलीस घटक

**संचारबंदीचे अनुषंगाने सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचे वतीने चार स्तरीय बंदोस्ताचे नियोजन, इतर तयारी व उपाययोजनांबाबत. -**

---

### १. संचारबंदी ठिकाणे -

सोलापूर जिल्हयात कोरोनाचा प्रसार व प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत असल्याने त्यावर नियंत्रण मिळविणेसाठी मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांनी दि.१६/०७/२०२० रोजी २३.५९ वा. पासून दि.२६/०७/२०२० रोजी २४.०० वा. पर्यंत सोलापूर जिल्हयात खालील ठिकाणी संचारबंदी लागू केलेली आहे.

| अ .क्र. | तालुका | गावे |
|---|---|---|
| १ | दक्षिण सोलापूर | बोरामणी, मुळेगाव, मुळेगाव तांडा, बक्षी हिप्परगा, कासेगाव, उळेगाव, विडी घरकूल,कुंभारी, वळसंग, होटगी, लिंबीचिंचोळी, तांदूळवाडी, |
| २ | उत्तर सोलापूर | ति-हे, पाकणी, कोंडी, बाणेगाव, मार्डी, नान्नज, तळे हिप्परगा, हगलूर, एकरुख, कारंबा, भोगाव |
| ३ | अक्कलकोट | अक्कलकोट शहर, मैंदर्गी |
| ४ | बार्शी | बार्शी शहर व वैराग शहर |
| ५ | मोहोळ | मोहोळ शहर, कुरुल, कामती खु., कामती बु. |

### २. इतर विभागासोबत समन्वय ठेवून करण्यात येणारी तयारी व उपाययोजना -

संचारबंदीच्या काळात विविध विभागांसोबत समन्वय ठेवून करण्यात येणारी तयारी व उपाययोजनांबाबत-

| अ.क्र. | तपशिल | कार्यवाही | विभाग |
|---|---|---|---|
| १ | कॉन्टॅक्ट ट्रेसिंग | बाधित रुग्णाच्या संपर्कातील व्यक्तींची यादी तयार करणे | आरोग्य विभाग |
| २ | स्वॅब टेस्टींग | बाधिताचे संपर्कातील हायरिस्क, लो रिस्क मधील जास्तीत जास्त व्यक्तींचे स्वॅब टेस्टींग करणे | आरोग्य विभाग |
| ३ | रॅपीड अॅन्टीबॉडी टेस्टींग | फ्रंड लाईन वर्कस, खाजगी रुग्णालयातील डॉक्टर्स व नर्सिंग स्टाफ, कोमॉर्बीड व्यक्ती व हॉटस्पॉट बनलेली ठिकाणी इ. ची रॅपीड अॅन्टीबॉडी टेस्टींग करणे | आरोग्य विभाग |
| ४ | बाधिताचे संपर्कातील व्यक्तींचे विलगीकरण | बाधिताचे संपर्कातील जास्तीत जास्तीत जास्त व्यक्तींना इन्स्टीटयुशनल कॉरंटाईन करणे | Incident Commander |
| ५ | जिवनावश्यक वस्तू पुरवठा साखळी | जिवनावश्यक वस्तू उदा-दुध, औषधे इ. चा योग्य प्रमाणात पुरवठा करणेसाठी पुरवठा साखळी तयार करणे | संबंधीत गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी |
| ६ | अॅक्टीव्ह व पॅसिव्ह सर्व्हेलन्स | आशा वकर्स / अंगणवाडी सेविका तसेच खाजगी शासकीय व खाजगी रुग्णालये आणि मेडीकल स्टाफ यांचे मार्फत योग्य पध्दतीने सर्व्हे करणे | आरोग्य विभाग |

### ३. नेमलेला बंदोबस्त -

संचारबंदीच्या काळात संचारबंदी लागू असलेल्या ठिकाणी खालीलप्रमाणे बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. -

| अधिकारी | कर्मचारी | होमगार्ड | आरसीपी पथक |
|---|---|---|---|
| ३५ | ३७५ | १०५ | ४ |

- **चार स्तरीय बंदोबस्त - सदरचा बंदोबस्त १. नाकाबंदी, २.पेट्रोलिग, ३.फिक्स पॉईंट, ४.कारवाई पथक अशा चार स्तरीय पध्दतीने लावण्यात येणार आहे.**

### ४. नाकाबंदी -

संचारबंदी क्षेत्रातील सर्व येणे-जाणेच्या मार्गांवर प्रभावीपणे नाकाबंदी नेमण्यात येणार आहे व अत्यावश्यक सेवा वगळून इतर सर्व प्रकारचे दळणवळण बंद करण्यात येणार आहे.

### ५. ड्रोनच्या वापर -

संचारबंदीच्या काळात संचारबंदी लागू असलेल्या ठिकाणी ड्रोनच्या मदतीने सर्वेक्षण करण्यात येणार असून संचारबंदीच्या आदेशाचे भंग करणा-यांवरती कायदेशिर कारवाई करण्यात येणार आहे.

### ६. स्वयंसेवक व कोविड वॉरिअर्स यांचा बंदोबस्त व इतर कामांसाठी वापर -

कोरोना बाधित क्षेत्रामध्ये **एकूण ७०० स्वयंसेवक व कोविड वॉरिअर्स** यांचा बंदोबस्तासाठी, बाधित क्षेत्रामध्ये अन्नधान्य व इतर मदत पुरविणेसाठी वापर करण्यात येणार आहे.

### ७. दुध विक्रेत्यांना पासेस वाटप -

संचारबंदीच्या काळात संचारबंदी लागू असलेल्या ठिकाणी सकाळी ०६.०० वा. ते सकाळी ०९.०० वा. पर्यंत दुध विक्रीसाठी दुध विक्रेत्यांना स्थानिक पोलीस ठाणेकडून दि.१५/०७/२०२० व दि.१६/०७/२०२० रोजी पासेस वाटप करण्यात येणार आहेत.

### ८. ग्रामसमितीचा वापर -

ग्रामसमिती सदस्य **ग्रामसेवक, पोलीस पाटील, तलाठी** वगैरे यांचे मदतीने संचारबंदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

### ९. मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचे आदेशान्वये करण्यात आलेली कारवाई -

| अ.क्र. | तपशिल | दि.०६/०७/२०२० रोजीपासून ते दि.१५/०७/२०२० पर्यंत | |
|---|---|---|---|
| | | केसेस | दंड रू. |
| १ | मास्क न वापलेले | २०३९७ | २०४०५०० |
| २ | दुचाकीवर दोघांनी प्रवास केलेले | ३५२३ | १४९९१०० |
| ३ | दुचाकीवर तिघांनी प्रवास केलेले | २२६ | ८१६०० |
| ४ | तीन चाकी वाहनात तीन पेक्षा अधिक व्यक्ती प्रवास | ११९ | ३१२५० |
| ५ | चार चाकी वाहनातून तिघांपेक्षा जास्त जणांनी प्रवास | ८५३ | ४२२५०० |
| ६ | निर्धारित वेळेनंतर दुकान सुरु ठेवलेले | १८४ | १११३०० |
| ७ | साठ वर्षापेक्षा अधिक वय असलेले मालक किंवा नोकर दुकाने/ आस्थापनामध्ये आढळलेले | ७३ | ७३०० |
| ८ | दुकानात ५ पेक्षा अधिक व्यक्ती आढळलेले | २७९ | १२५३०० |
| ९ | होम क्वारंटाई योग्य रितीने न पाळलेले | ७५ | ७५०० |
| १० | सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास | १२६९ | २४४९०० |
| ११ | सोशल डिस्टंनसिंग चे पालन न केलेले | ५८९ | ५९३०० |
| १२ | सार्वजनिक ठिकाणी दारू, पान, तंबाखु सेवन | ८६० | १७४२०० |
| १३ | दुकानदार /व्यावसायिक/फिरते फळ व भाजी विक्रते मास्क न वापरलेले | ३८० | ३९५०० |
| | एकूण | २८,८२७ | ४८,३९,३५० |

### १०. नागरिकांना आवाहन -

संचारबंदीच्या काळात संचारबंदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी नागरिकांनी पोलीसांना सहकार्य करावे अन्यथा नियमांचे उल्लंघन करणा-यांविरुध्द कायदेशिर कारवाई केली जाईल.

(अतुल झेंडे)
अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण